राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांकरीता खरेदी करण्यात आलेल्या १२३२ Laptops मध्ये Antivirus Licences Install करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता व निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्र. संगणक-२०१७/प्र.क्र. ८२/का. ०७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०३ सप्टेंबर, २०१९.

वाचा :- १) माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय दिनांक ०१.०८.२०११.

२) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र क्र.Spl./Comp./७३८/२०१७, दिनांक २७.१०.२०१७.

३) समक्रमांकाचे शासन निर्णय दिनांक ०२.०३.२०१९.

४) केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई यांचे पत्र क्र.Spl./Com./३३७/२०१९, दिनांक २५.०६.२०१९

५) दिनांक २२.०८.२०१९ रोजीच्या विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणीसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त .

प्रस्तावना :-

राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांना १२३२, (२ in १) Convertible Laptops खरेदी करण्यास दिनांक २.३.२०१९रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. संदर्भ क्र. ४ अन्वये राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांना १२३२ इतके (२ in १) Convertible Laptops मध्ये Antivirus Licences Install करणेबाबतची विनंती केली होती. विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दिनांक २२.०८.२०१९ रोजीच्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या १२३२, (२ in १) Convertible Laptops मध्ये Antivirus Licences Install करण्यासाठीच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील न्यायिक अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या १२३२, (२ in १) Convertible Laptops मध्ये Antivirus Licences Install करण्यासाठीच्या रु. २७,६२,१४४/- (अक्षरी रु. सत्तावीस लक्ष बासष्ट हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. १२३२ (२ in १) Convertible Laptops साठी आवश्यकAntivirus Licences ची खरेदी हीउद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक२४.०८.२०१७ व ०८.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार GeM पोर्टलवरुन शासनाच्या विहित पध्दतीने करण्यात यावी.

३. याप्रित्यर्थ होणारा खर्च "मागणी क्र. जे-२, २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा, (००) विधी व न्याय विभाग, (००) (०२) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद (२०५२ ५११६) या लेखाशिर्षाखाली "१७ संगणक खर्च" या उदिष्टांतर्गत भागविण्यात यावा.

४. १२३२, (२ in १) Convertible Laptops मध्ये Antivirus Licences Install करण्यासाठी आवश्यक रु. २७,६२,१४४/- (अक्षरी रु. सत्तावीस लक्ष बासष्ट हजार एकशे चव्वेचाळीस फक्त) इतका निधी महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,जे ०००२ यांना वितरीत करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-१ उप विभाग-२ मधील अ. क्र. २७ (अ) नियम क्र. ७६ मधील २ व ३ या अटींच्या अनुषंगाने प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमुन्यात त्वरीत शासनास सादर करावे.

७. सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे. त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०३१६१०५०१५१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nitin Virsen Jiwane

Digitally signed by Nitin Virsen Jiwane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=eaafa52b8f5b995089773c42d6ed2475cd061a337b724d4714 00fbcfb074e051, serialNumber=38da45fc182de9210d4220cd41371018a4d6f00892e5d 1478cba8413afb06c03, cn=Nitin Virsen Jiwane
Date: 2019.09.03 16:17:29 +05'30'

(नितीन वि. जिवने)
विधि सल्लागार-नि-सह सचिव.

प्रति,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,
२. केंद्रीय प्रकल्प समन्वयक, ई-कोर्ट प्रकल्प, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता, लेखा परीक्षा),-१/ २, मुंबई/नागपूर,
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. संचालनालय, लेखा व कोषागारे , ठाकरसी हाऊस ३, मुंबई पोर्ट ट्रस्ट, २ रा मजला, शुरजी वल्लभदास मार्ग, बेलार्ड इस्टे, मुंबई.
८. संचालक, उद्योग सह संचालक (भांख) / उद्योग संचालनालय, मुंबई.
९. सह सचिव २०, २३ व २४, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.निवड नस्ती.